# महाराष्ट्र राज्य निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे

## सन 2017 ते 2021 या कालावधीसाठी संघटनेच्या वतीने सचिवांचा अहवाल

1) **महाराष्ट्र शासनाकडून सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या कृतिशील व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा व त्यांच्या स्वत:च्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत रहावेत** या उद्‌देशाने कृतिशिल निवृत्त अधिकारी कर्मचारी मध्यवर्ती संस्था पुणे येथे दि.31/05/2014 रोजी कार्यरत झाली आहे. हि संस्था, सहाय्यक संस्था निबंधक, पुणे यांचेकडील नोंदणी क्र. 1151 दि.31/05/2014 अन्वये तसेच धर्मादाय आयुक्त, पुणे यांचेकडील नोंदणी क्र. फ-48300 दि.23/03/2017 अन्वये शासन मान्य आहे.

2) मे 2014 मध्ये मंत्रालय, मुंबई येथे अखील भारतीय राज्य कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. र. ग. कर्णीक, महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री.अरुण बोंगिरवार, निवृत्त पोलिस महासंचालक श्री.अरविंद इनामदार, श्री.नंदकुमार जंत्रे, निवृत्त सचिव, सा.प्र.विभाग, मंत्रालय, श्री.भालचंद्र जोशी, निवृत्त अवर सचिव, पाटबंधारे विभाग, श्री. योगीराज खोंडे, अध्यक्ष, राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटना, मंत्रालय, श्री. टी. के. गुरव, अध्यक्ष, कर्मचारी कल्याणकारी संस्था, पुणे यांनी एकत्र येऊन **"कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था"** स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी आमंत्रित केलेल्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची निवड करणेत आली.

| | सर्वश्री / श्रीमती | |
|---|---|---|
| 1 | अरुण बोंगिरवार, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| 2 | अरविंद सिद्‌धेश्वर इनामदार, भा.पो.से. | विशेष अध्यक्ष |
| 3 | नंदकुमार येडबा जंत्रे, भा.प्र.से. | उपाध्यक्ष |
| 4 | शितल अशोक गुप्ते | उपाध्यक्षा |
| 5 | रमाकांत गणेश कर्णीक | कार्याध्यक्ष |
| 6 | भालचंद्र त्र्यंबक जोशी | सहकार्याध्यक्ष |
| 7 | शिवदास रंगनाथ साळुंके | सचिव |
| 8 | तुकाराम केशव गुरव | सहसचिव |
| 9 | दादाराव चिनकुजी सांगळे | कोषाध्यक्ष |
| 10 | नारायण सखाराम गरुड | सहकोषाध्यक्ष |
| 11 | सुलोचना हरसिंग पाटील | सदस्य |
| 12 | योगिराज खोंडे, अध्यक्ष, राज्य कर्मचारी संघटना, मुंबई | पदसिद्‌ध सदस्य |

| | | |
|---|---|---|
| 13 | टी.के.गुरव, अध्यक्ष, शासकीय कर्मचारी कल्याणकारी संस्था, पुणे | पदसिद्ध सदस्य |

स्थापना झालेनंतर राज्यात पुणे, सातारा, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, भंडारा, गोंदिया, सोलापूर या जिल्हा समन्वय समित्यांची स्थापना करणेत आली.

3) या संस्थेचे कामकाज व त्याचा प्रचार व प्रसाराचे कामकाज मध्यंतरी कोरोनाचे उद्रेकामुळे व काही पदाधिकारी कार्यरत नसलयामुळे काहीसे थंडावले होते. तरीसुद्धा राज्यात जिल्हा स्तरावर सातारा, सोलापूर, पुणे, नाशिक, भंडारा, नांदेड, अमरावती व अहमदनगर या जिल्हयांसाठी कार्यकारीणीमार्फत त्यांचे कामकाज जोरात सुरु आहे. तसेच राज्यात इतर 15 जिल्हयात औरंगाबाद, अकोला, जळगाव, धुळे, जालना, बीड, सांगली, कोल्हापूर, चंद्रपूर, बुलढाणा, गडचिरोली, रायगड, ठाणे, मालेगाव इ. ठिकाणी प्रवर्तक नेमण्यात आले असून संघटना बांधणीचे काम जोराने सुरु आहे. तर उर्वरीत 12 जिल्हयांत प्रवर्तक नेमण्याची चाचपणी सुरु आहे. माहे डिसेंबर 2022 अखेर महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांत समन्वय समित्या कार्यरत करण्याचा निर्धार या नूतन वर्षाचे आरंभास करणेत आला आहे. राज्यातील सध्या कार्यरत 8 जिल्हयातील समन्वय समितीचे पदाधिकारी यांचा नाववार तक्ता तसेच उर्वरीत 15 जिल्हयातील कार्यरत प्रवर्तकांचा तपशिल या स्मरणिकेत समावेश करण्यात आला आहे.

**4) सेवानिवृत्तांचे पेंशनविषयक प्रश्न सोडविणे, त्यांच्या सुरक्षिततेची व स्वास्थ्याची काळजी घेणे हि कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत. तसेच त्यांचे वैयक्तिक अडीअडचणींवर, त्यांनी विनंती केल्यास, त्यांना मोफत सल्ला/मार्गदर्शन करण्यात येणार आहे.**

केंद्र सरकारने जेष्ठ नागरिकांसाठी सुधारीत 2016 मागदर्शक सूचना तर महाराष्ट्र शासनाने सुध्दा दि.9 जुलै 2018 च्या शासन निर्णयान्वये जेष्ठ नागरिकांचे धोरण प्रसिध्द केले आहे. शासनाने प्रसिध्द केलेल्या धोरणाबाबत येणाऱ्या अडीअडचणी तसेच विनासायास त्याची अंमलबजावणी होणेच्या दृष्टीकोनातून आपल्या निवृत्त बंधू भगिनींना तसेच असंघटीत ज्येष्ठ नागरिकांना सरकारच्या धोरणांची माहिती उपलब्ध करुन देणेसाठी राज्यस्तरावर या संस्थेकडून /संघटनेकडून कार्यवाही होणेही अत्यावश्यक आहे.

सेवानिवृत्त व जेष्ठांसाठी आरोग्य तपासणी तसेच व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, संमेलने आयोजित करणे, सभासदांचे हितसंबंध वृध्दींगत व्हावे, या व अशा एकना अनेक बाबींच्या दृष्टीने सामाजिक बांधीलकी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करणे प्रस्तावित आहे.

संघटन अधिक कार्यक्षम व तत्पर होणेसाठी तालुका, जिल्हा व प्रदेश पातळीवर तसेच राज्यभर बळकटीकरण व विस्तार करणेकामी तसेच आपणा सर्वांची वयोमानात झालेली

वृध्दी विचारात घेता आपण सर्व निवृत्त अधिकारी कर्मचारी यांनी राज्यभर एकत्र येऊन कार्यक्षम संस्था म्हणून लौकीक मिळवू या असे आवाहन करण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक सभासदाने रु.1000/- आजीव सभासद फी व रु.100/- वार्षिक सभासद फी तसेच प्रवेश फी रु.10/- फॉर्म भरुन आपला सहभाग नोंदवावा, ही आग्रहाची विनंती.

5) दि.28/10/2018 रोजी दु.3-00 वा. राज्यस्तरीय जिल्हा शाखांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक एस.एम.जोशी फाऊंडेशनच्या सभागृहात घेण्यात आली. त्यास भंडारा जिल्हा शाखा वगळून इतर सर्व स्थापित शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते. भंडारा जिल्हा शाखा पदाधिकारी, यांना रेल्वेचे आरक्षण मिळू न शकल्याने उपस्थित राहता आले नाही. या बैठकीचे संक्षिप्त वृत्तांकन पुढे जोडले आहे.

6) मुंबई येथे दि.16/2/2015 रोजी बैठक घेणेत आली. त्यामध्ये श्रीधर सारंग यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाची निवड करणेत आली. **पण तिने पुढे कामच न केल्यामुळे ती क्रियाशिल राहिली नाही.**

7) कोकण भवन येथे दि.29/04/2015 रोजी बैठक घेतली. त्यास नव्या मुंबईचे सर्वश्री / श्रीमती 1) मच्छिंद्र भाई, 2) किसन गोदे, 3) श्रीधर सारंग, 4) मंगल कुलकर्णी उपस्थित होते. सदर बैठकीस मध्यवर्ती संस्थेचे श्री.र.ग.कर्णिक उपस्थित होते**. पुढे कामच न केल्याने ही शाखा कार्यरत राहिली नाही.**

8) दि.10/07/2017 रोजी सातारा जिल्हा शाखेची स्थापना झाली. संस्थेचे सचिव श्री.शिवदास साळुंके, सहसचिव श्री.टी. के. गुरव व तत्कालीन पुणे जिल्हा शाखेचे कार्याध्यक्ष श्री.प्रकाश नानगुडे यांनी सातारा दौरा केला.

9) दि.18/03/2017 रोजी सोलापूर जिल्हा शाखेची स्थापना झाली. मध्यवर्ती संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.बी.व्ही.जोशी व सचिव श्री. शिवदास साळुंके यांनी सोलापूर दौरा केला.

10) दि. 6/11/2026 ते 10/11/2026 पर्यंत मध्यवर्ती संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.बी.व्ही.जोशी व सचिव श्री. टी. के. गुरव, सभासद श्री. पी.डी. मोरेश्वर यांनी नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्हयांचा दौरा केला.

वरील सर्व जिल्हयात समन्वय समित्या स्थापन झाल्या तरी प्रत्यक्षात समन्वय समितीचे संनियंत्रण मध्यवर्ती कार्यकारी मंडळाकडून प्रभावीपणे झाले नाही. यानंतर कोरानाचे पहिल्या वर्षानंतर संस्थेचे कामकाज सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आहे.

11) जे पदाधिकारी मयत झाले आहेत, त्यांचे जागेवर कोअर कमिटीने ऑनलाईन बैठकीत चर्चा करुन खालीलप्रमाणे पदाधिकारी यांची नेमणूक संबंधीतांचे सहमतीने करण्यात आली.

इंजि. बाळासाहेब साळुंके, श्रीमती सुनंदा जरांडे यांची मध्यवर्ती संस्थेच्या कोअर कमिटीवर सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले. ( दि. 08/10/2020)

महाराष्ट्रातील पुणे विभागाचे निवृत्त महसूल आयुक्त मा. चंद्रकांत दळवी, (भा.प्र.से.) यांची या संस्थेचे अध्यक्ष, श्री. व्यंकटराव गायकवाड, जलसंपदा विभागाचे सेवा निवृत्त सचिव यांची विशेष अध्यक्षपदी तर इंजि. मनोहर पोकळे, से.नि. मुख्य अभियंता व सहसचिव यांची कार्याध्यक्ष पदी त्यांच्या सहमतीने सर्वानुमते निवड करण्यात आली. ( दि.8/12/2020)

श्री. रविंद्र धोंगडे, निवृत्त संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांची संस्थेच्या उपाध्यक्ष पदी निवड (14/0/02021) तर श्री शिवाजी सुखदेव मानकर, निवृत्त संचालक, माहीती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई यांची संस्थेच्या उपाध्यक्ष पदी (दि. 26/08/2021) रोजी निवड करण्यात आली.

श्री. गिरीष सांगळे, कार्यकारी तांत्रिक (01/03/2021)

मध्यंतरी कोरोना व्हायरसचे पार्श्वभूमीवर सन 2020 या वर्षात साधारणत: 7 ते 8 महिने लॉक डाऊन असल्याने सदस्यांना एकत्र येणे व समक्ष सभेचे आयोजन करणे शक्य होत नव्हते. त्यावर पर्याय म्हणून संस्थेची कृतिशिल कोअर कमिटी स्थापन करुन या कमिटीची साधारणत: दर 15 ते 20 दिवसांनंतर झुमअॅपद्वारे बैठक दि.02/09/2020 पासून सुरु करण्यात आली. आज अखेर झुमअॅपवर 13 बैठका तर समक्ष सदस्यांना बोलावून कोअर कमिटीच्या 12 बैठका घेण्यात आल्या.

यात संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा समन्वय समित्या स्थापन करण्याबाबतचे धोरण ठरविण्यात आले.

जिल्हा स्तरावर पदाधिकारी नेमून संघटनेचा विस्तार होत नसल्याचे दिसून आले. यास्तव प्रत्येक जिल्हास्तरावर प्रवर्तक नेमून योग्य ती चाचपणी घेऊन प्रथमत: सदस्य नोंदणी मोहिम हाती घ्यावी. साधारणत: 150 सभासद झालेवर जिल्हा कार्यकारणी स्थापन झाल्यावर प्रवर्तकांची भूमिका संपुष्टात येऊन कार्यभार कार्यकारणी पाहीन, अशी भूमिका सर्वानुमते मान्य करणेत आली.

12) सन 2021 मध्ये अहमदनगरचे प्रवर्तक इंजि.मनोहर पोकळे यांनी दि.1/10/2021 रोजी अहमदनगर शाखेची समन्वय समिती कार्यान्वित केली. त्यावेळेस 199 एकूण सभासद झाले होते. याच कालावधीत **"सभासद सुधारीत फॉर्म"** मंजूर करण्यात येवून सेवानिवृत्तांना खंबीर साथ मिळून तणावरहीत जीवन जगता येईन. असे अभिप्रेत होते.

13) संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय वृद्धींगत व्हावा म्हणून **"कृतिशील संस्था, महाराष्ट्र", "कृतिशील कोअर कमिटी" व प्रत्येक जिल्हानिहाय Whats App Group** कार्यान्वित करणेत आले आहेत.

14) संस्थेचे पत्रव्यवहारासाठी ई मेल आयडी "asgrf2014@gmail.com" कार्यान्वित करणेत आला येऊन नाशिक, पुणे, सातारा, अमरावती, सोलापूर यांचे ई.मेल आयडी तयार

करण्यात आले असून वापरही सुरु करण्यात आला आहे, तर उर्वरीत जिल्ह्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. जग हे संदेश देवाणघेवाण बाबत गतिमान झाले आहे. आपल्या सभासदांच्या अपेक्षा अनाशाये त्याप्रमाणात वाढल्या आहे. त्यास सामोरे जाताना E.Mail कार्यपद्धती आत्मसात करणे ही काळाची गरज असणार आहे.

15) प्रत्येक सदस्याचे **वैयक्तिक तपशील प्रपत्रही** अंतिम करणेत आले असून अशी माहिती भविष्यातील कामाचे नियोजनासाठी जिल्हा/राज्यस्तरावर वापर करणेत यावा असे अपेक्षित आहे.

16) या संस्थेचा **लोगो** सर्वानुमते अंतिम करणेत आला आहे.

17) कृतिशिल कोअर कमिटीने नवीन सदस्यांची नेमणूक केल्याने नाविन्यपूर्ण असे Letter Head तयार करण्यात आले.

18) सन 2020 मधील 10 महिन्यांच्या कालावधीकरीता कोरोनाचा पहिला टप्पा होऊन गेल्याने दि.12/02/2021 रोजी सर्वांना पुन:श्च हरिओमचा नारा देवून सर्वसाधारण सभा माहे मार्च 2021 मध्ये घेण्याचे ठरले परंतु मार्च 2021 नंतर कोरोनाची दुसरी महाभयंकर लाट आल्याने कामकाजावर विपरीत परिणाम झाला.

19) मध्यवर्ती संस्थेची स्थापना सन 2014 पासून होऊनही श्री. भा.वि.जोशी, सहकार्याध्यक्ष यांचे निवासस्थानातून कामकाज होत होते. परंतु ते आता वयोवृद्ध झाल्याने व ते त्यांचे मुलाकडे कोरोनोचे कालावधीत गेल्याने कार्यालयीन कामकाज करणे शक्य होत नसल्याने मा. सचिव (प्रकल्प समन्वयक), जलसंपदा विभाग, मुंबई यांना दि.21/12/2020 रोजी पत्र लिहून पाठपुरावा केला. पुणे येथील दशभुजा गणपती, अष्ट विनायक मित्रमंडळ, जलसेवाभवन, कोथरुडचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना सादर केला. यावर शासनाने कार्यकारी संचालक,कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना जागा देणेविषयी दि.4/5/2021 चे पत्रान्वये आदेशित केले आहे. यानंतर शासन व महामंडळ स्तरावर पाठपुरावा सुरु केला. आता महामंडळाने नियामक मंडळावर विषय घेतला आहे.

सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि.20/03/2021 पासून पाठपुरावा सुरु आहे. तर कोथरुड येथील महानगरपालिकेचे जागेसाठी श्री.प्रशांत जगताप, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस यांची समक्ष भेट घेवून मागणीपत्र सादर केले आहे. (दि. ------------------)

20) संस्थेच्या निधीवाढीसंबंधात दि.26/08/2021 रोजीच्या बैठकीत चर्चा झाली. त्यात आश्रयदाता फी रु.10000/- केली. ८०-G चा आयकर आयुक्तांकडे प्रस्ताव सादर करणे, दानशूर व्यक्तीकडून देणगी मिळविणे, C.S.R. निधी इ.इ. यांत संस्थेने हे व्यवहार अद्यावत, पारदर्शक ठेवणेविषयी सूचित केले.

21) कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संस्थेमार्फत हाती घ्यावयाच्या उपक्रमांची यादी, (44 उपक्रम) अंतिम करणेत आले. त्यानुसार जिल्हा समन्वय समितीने उपक्रम हाती घ्यावेत, म्हणजे सामाजिक कार्यात सारखेपाणा येईन. यात जिल्हास्तरीय समितीस काही उपक्रम हाती घ्यावे असे वाटले तरी ते घेण्याबाबत लवचिकता ठेवणेत आली आहे.

22) जिल्हा समन्वय समितीस मदतनीस म्हणून **(अ) पेंशनर उपसमिती, (ब) दक्षता उपसमिती व (क)आरोग्य उपसमिती** स्थापन करुन संस्थेचे कामकाज लोकाभिमुख होऊन समाजात चेतन्य निर्माण होवून संस्था आधारवृक्ष म्हणून कार्यरत राहणार आहे. अश्या समित्या पुणे व अहमदनगर जिल्हा समन्वय समितीने स्थापन करुन कामही सुरु केले आहे. तर उर्वरी जिल्हा समन्वय समितीत अशी कार्यवाही प्रगतीत आहे.

23) ही संस्था व त्यांचे अंतर्गत जिल्हा समन्वय समितीचे कामकाज पारदर्शक होणेचे दृष्टीने उपलब्ध निधीतून खर्च भागविणेसाठी **काटकसरीच्या उपाययोजनास मान्यता** देणेत येऊन सर्वांनी अनुपालन करणेची आवश्यकता आहे.

24) **"कृतिशील निवृत्त राज्यस्तरीय विचार मंच"** - सर्वांना सन्मानाचे जीवन जगता यावे, ज्येष्ठ नागरीक धोरण सन 2018 ची अंमलबजावणी, नवनवीन संकल्पनांचा वापर करुन आरोग्य सुखकारक व्हावे, असंघटीत क्षेत्रातील ज्येष्ठांना आपल्या सेवा कालावधीत मिळालेले ज्ञानाचा वापर करुन जीवन जगणे सुकर व्हावे, हा विचार या मंचासाठीचा आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेंशनचे व इतर जीवनातील प्रश्नांबाबत सोडवणूक करणेसाठी सर्वतोपरी मदत करणे, सुशिक्षित तरुण, महिला, दिव्यांगासाठी उचित मार्गदर्शन व शासनाच्या विविध योजना राबविणेस मदत करणे, इ. यासाठी "विद्या विनयेन शोभते" व "विद्वान सर्वत्र पुज्यते" या प्रचलित निकषाद्वारे शासनाकडे नवनवीन प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. हा मंच दि.1 जानेवारी 2022 पासून कार्यान्वित करणेत आला आहे.

25) जिल्हा शाखा, नागपूर व गोंदियाचे असमाधानकारक कार्यवाहीबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

26) प्रत्येक जिल्हा समन्वय समितीने प्रत्येक वर्षाचे सामाजिक कामाचे वार्षिक नियोजन करणेसाठी सर्वांना सूचित केले आहे.

27) दि.31/01/2022 अखेर राज्यात एकूण 1252 सभासद झाले असून आजीवन सभासद 1022 वार्षिक सभासद 230 आहेत.

28) पुणे महसूल विभागात 4 जिल्ह्यांना या संघ्टनेचे कार्याध्यक्ष इंजि. एम. के. पोकळे, सहसचिव श्री. टी. के. गुरव व कार्यकारी सदस्य श्री. गिरीष सांगळे यांनी संघटना बांधणी कामासाठी जसे उद्दीष्ठे, भूमिका व कार्यकक्षा तसेच सामाजिक बांधीलकी या विषयी सविस्तर सुसंवाद साधणेकामी सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या जिल्ह्यांचा अनुक्रमे 11, 12 व 13 डिसेंबर 2021 तसेच 4 जानेवारी 2022 रोजी दौरा पूर्ण केला.

**कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था, पुणे यांनी केलेल्या पत्रव्यवहाराचे विवरणपत्र**

| अ.क्र. | विषय | संबंधीत | संदर्भ |
|---|---|---|---|
| 1) | वृद्धाश्रम स्थापन करणे अथवा अस्तित्वात असलेल्यांना मदत करणे | मा.आयुक्त समाजकल्याण विभाग, पुणे | 354/2018 दि.27/12/2018 |
| 2) | मुख्यमंत्री मित्र योजना | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | दि.8/6/2016 |
| 3) | श्री. वि. म. गाडेकर, निवृत्त उपअभियंता यांचे प्रलंबित मागण्यांची रक्कम प्रदान करणेबाबत | प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई | 178/17 दि.18/2/2017 |
| 4) | अतिउत्कृष्ठ कामे केल्यामुळे देणेत आलेल्या दोन आगाऊ वेतनवाढी पुर्ववत मिळणेबाबत | प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई | 357/21/1 दि.24/09/2018 |
| 5) | संस्थेच्या कार्यालयासाठी जागा मिळणेबाबत | 1) सा.बां.मंडळ, पुणे | 265/15 दि.12/12/2015 |
| | | 2) पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे | 37/247/17 दि.12/09/2017 |
| | | 3) जिल्हाधिकारी, पुणे | 17/246/17 दि.31/10/2017 |
| 6) | कार्यरत व सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी /कर्मचारी व अखील भारतीय सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचे करीता वैद्यकीय प्रतिपूर्ती विमा छत्र योजना | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | 100/367/2018 दि.28/11/2018 |
| 7) | शासकीय कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण सोसायटीला शासनाने मंजूर केलेल्या जमीनीचा ताबा देणे बाबत | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | 100/365/2018 दि.28/11/2018 |
| 8) | जलसंपदा विभागाची मोकळी जमिन कर्मचाऱ्यांचे सहकारी गृहनिर्माण संस्थेस देणेबाबत (स.नं.83, 84 सांगवी पिंपरी चिंचवड म.न.पा.) | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | 100/366/2018 दि.28/11/2018 |
| 9) | निवृत्त झाल्यावर वाढत्या वया बरोबर वाढणारा खर्च | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | 100/368/2018 दि.28/11/2018 |
| 10) | नागरी जमिन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम 1976 प्रमाणे ऑक्टोबर, नोव्हेंबर 2007 मध्ये माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांनी कलम 34 अन्वये पुण्यातील 172 प्रकरणांत रिव्हीजन आदेश (order) दिले परंतु, त्याची | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | 100/369/2018 दि.28/11/2018 |

| अ.क्र. | विषय | संबंधीत | संदर्भ |
|---|---|---|---|
| | अंमलबजावणी न झाल्यामुळे शासनाचे अब्जावधी रुपये जमिन मालकांकडे 10 वर्ष बिनव्याजी पडून. वसुली झाली नाही. | | |
| 11) | शासकीय-निमशासकीय अधिकारी कर्मचारी व निवृत्तांसाठी घरकुल योजना | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | 100/364/2018 दि.28/11/2018 |
| 12) | देशात सर्वप्रथम स्थापन झालेल्या महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील निवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडे दि.20/12/2017 रोजी संमत केली कुटुंब निवृत्ती योजना लागू करणेबाबत | मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | 100/370/2018 दि.28/11/2018 |

---000---